महाराष्ट्र शासन
गृह विभाग

शासन ज्ञापन क्र. एसआयएस-१११८/प्र.क्र.४४१/दोन/पोल-७.
मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.

दिनांक ३० मार्च २०१९.

विषय :- भारत सरकार, गृह मंत्रालय, यांच्या *"Special Infrastructure Scheme (SIS), including construction of 250 Fortified Police Stations in LWE affected States"* या केंद्र पुरस्कृत योजनेच्या प्रयोजनासाठी सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाच्या सुधारित अंदाजांनुसार राज्य हिस्सा (४० टक्के) अनुदान खर्च करण्यास मंजुरी देण्याबाबत.

संदर्भ :-

१) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१८/ प्र.क्र.६९/ अर्थ-३, दिनांक ०२.०४.२०१८.

२) शासन निर्णय, गृह विभाग, क्र.पीडब्ल्युएफ-०११८/ प्र.क्र.५८/ पोल-७, दिनांक ०५.०४.२०१८.

३) भारत सरकार, गृह मंत्रालय, एलडब्ल्युई विभाग, यांचे पत्र क्र. १८०१५/ ०२/ २०१८- एलडब्ल्युई-४, दिनांक ०६.०७.२०१८.

४) शासन निर्णय, गृह विभाग, क्र.पीडब्ल्युएफ-०११८/ प्र.क्र.५८/ पोल-७, दिनांक १५.०९.२०१८.

५) शासन पत्र, गृह विभाग, क्र.पीडब्ल्युएफ-०११८/ प्र.क्र.५८/ पोल-७, दिनांक २५.०९.२०१८.

६) शासन पत्र, गृह विभाग, क्र. एसआयएस-१११८/ प्र.क्र.४४१/ पोल-७, दिनांक ०७.१२.२०१८.

७) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१८/ प्र.क्र.६९/ अर्थ-३, दिनांक २५.०१.२०१९.

८) म.रा. पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या. यांचे पत्र क्र. पोगृम/ लेखा-शाखा/ न.क्र.४५(१)/ ७३७/ २०१९, दिनांक ०७.०३.२०१९.

९) पोलीस महासंचालक, म.रा., यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. पोमसं/ २१-अ/ १९५/ एसआयएस-स्कीम/ १५१/ २०१७, दिनांक १३.०३.२०१९.

१०) शासन पत्र, गृह विभाग, क्र. एसआयएस-१११८/ प्र.क्र.४४१/ पोल-७, दिनांक १४.०३.२०१९.

ज्ञापन.-

भारत सरकार, गृह मंत्रालय, यांच्या *"Special Infrastructure Scheme (SIS), including construction of 250 Fortified Police Stations in LWE affected States"* या योजनेच्या प्रयोजनांसाठी, सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाच्या सुधारित अंदाजांनुसार *गृह*

विभाग-मागणी क्रमांक बी-१०, ४०५५, पोलीसांवरील भांडवली खर्च, ००, २०७, राज्य पोलीस (००) (००)(०४) नक्षलग्रस्त भागामध्ये सुसज्ज पोलीस ठाणे बांधणे (४० टक्के राज्य हिस्सा) (अनिवार्य) (४०५५०२१४) या तपशीलवार लेखाशीर्षाखाली "५३-मोठी बांधकामे" या उद्दिष्टाकरिता रु.६,००,००,०००/- *(रुपये सहा कोटी फक्त)* इतके अनुदान मंजूर करण्यात आले आहे. उक्त रक्कम अर्थसंकल्प वितरण प्रणाली द्वारे वितरित करण्यात आली आहे.

२. शासन निर्णय, गृह विभाग, क्र. पीडब्ल्युएफ-०११८/ प्र.क्र.५८/ पोल-७, दिनांक १५.०९.२०१८, द्वारे उक्त तपशीलवार लेखाशीर्षाखाली "५३-मोठी बांधकामे" या उद्दिष्टाकरिता चालू (सन २०१८-१९) वित्तीय वर्षात मंजूर अनुदानापैकी रु.२,००,००,०००/- (रुपये दोन कोटी फक्त) वितरित करणे व खर्च करणे यांकरिता मंजुरी देण्यात आली होती. बाकी रु.४,००,००,०००/- (रुपये चार कोटी फक्त) खर्च करण्यास, याद्वारे, मंजुरी देण्यात येत आहे.

३. उक्त रक्कम अर्थात रु.४,००,००,०००/- (रुपये चार कोटी फक्त) कोषागारातून काढून ती संबंधितांना प्रदान करण्याच्या प्रयोजनासाठी पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, मुक्काम-नागपूर, यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, यांनी उक्त रक्कम कोषागारातून काढून ती व्यवस्थापकीय संचालक, म.रा. पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या., यांना प्रदान करावी.

५. व्यवस्थापकीय संचालक, म.रा. पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या., यांनी उक्त रक्कम ही *"Special Infrastructure Scheme (SIS), including construction of 250 Fortified Police Stations in LWE affected States"* या योजनेखाली मंजूर करण्यात आलेले २० पोलीस ठाणे/ उप पोलीस ठाणे यांच्या इमारतींचे बांधकाम करण्यासाठी खर्च करावी.

६. हे ज्ञापन, शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१८/ प्र.क्र.६९/ अर्थ-३, दिनांक ०२.०४.२०१८ आणि शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१८/ प्र.क्र.६९/ अर्थ-३, दिनांक २५.०१.२०१९ यांच्या अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. हे ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०४०११२३७२०४८२९ असा आहे. हे ज्ञापन डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL GOPAL BORSE

Digitally signed by SWAPNIL GOPAL BORSE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=c6a6e7cad855fc787a96e36f11fbc87a9f66cfd9bad0118449 3f2735ad885627, postalCode=400032, street=2ND FLOOR,MANTRALAYA,MADAME CAMA MARG,MUMBAI, serialNumber=8538cd1e408948f7d025537d5f6589bd8958d1b9532 2e66d2cc5edf89ad0d79e, ou=HOME DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SWAPNIL GOPAL BORSE
Date: 2019.04.01 12:45:09 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) पोलीस महासंचालक, म.रा., मुंबई.

२) व्यवस्थापकीय संचालक, म.रा. पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या., मुंबई.
३) अपर पोलीस महासंचालक, विशेष कृती, म.रा., मुंबई.
४) पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, मुक्काम-नागपूर.
५) पोलीस अधीक्षक, गोंदिया.
६) पोलीस अधीक्षक, गडचिरोली.

प्रत-

१) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
३) जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर/ गोंदिया/ गडचिरोली.
४) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
६) कार्यासन अधिकारी (व्यय-७/ अर्थ-३), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) निवड फाईल (पोल-७).